# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः18.08.2024** **वारःशुक्रवार**

---

**ठळक बातम्या**

जागतिक आव्हानांचा सामना एकजुटीनं करण्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं ग्लोबल साऊथ शिखर बैठकीत विकसनशील देशांना आवाहन

परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंक आज कुवेतच्या दौऱ्यावर

आरोग्य कर्मचाऱ्यांवरील हिंसाचार रोखण्यासाठी कायदा आणण्याची भारतीय वैद्यकीय संघटनेची पंतप्रधानांकडे मागणी

आणि

मुंबईतल्या 26-11च्या दहशतवादी हल्ल्यातल्या आरोपी तहव्वूर हुसैन राणाला भारताच्या ताब्यात देण्याला अमेरिकेतल्या न्यायालयाची मंजूरी

**पंतप्रधान**

अनिश्चितता, भूराजकीय युद्ध, रोगराई अशा जागतिक आव्हानांचा सामना विकसनशील देशांनी एकजुटीनं करावा, असं आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं. व्हॉईस ऑफ ग्लोबल साऊथ संघटनेच्या शिखर बैठकीत ते काल बोलत होते. दूरस्थ पद्धतीनं ही बैठक झाली; याचं यजमानपद भारताकडे होतं. हवामान बदल, आरोग्य, खाद्य आणि ऊर्जा सुरक्षेचा सामना या देशांना करावा लागतो आहे. दहशतवाद, कट्टरतावाद आणि फुटीरतावाद हे देखील समाजाला धोकादायक असल्याचं ते म्हणाले. व्यापार आणि दळणवळणाला प्रोत्साहन, शाश्वत विकास उद्दिष्ट आणि महिलांचा; 'विकास प्रक्रीयेत' वाढता सहभाग या मुद्द्यांवर भारत कटीबद्ध असल्याचं त्यांनी सांगितलं.

**जयशंकर**

तिसऱ्या ग्लोबल साऊथ परिषदेत, अन्न, आरोग्य, उर्जा सुरक्षा यांसह विविध महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा करण्यात आल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर यांनी म्हटलं आहे. या बैठकीचा काल समारोप झाला. त्यानंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना डॉक्टर जयशंकर यांनी संयुक्त राष्ट्रसंघात सुधारणा करण्याविषयी गरज असल्याचं सांगून सदस्यांमध्ये तशी भावना वाढत असल्याचं सांगितलं. या बैठकीत इतरही विषयांवर चर्चा झाली त्यामध्ये संसाधनांविषयीची आव्हाने, संसाधनांपर्यंत पोचणे

आणि रोजगार आणि आर्थिक असमानता या समस्यांचा समावेश होता.  अनेक नेत्यांकडून हे मुद्दे मांडण्यात आले असल्याचं जयशंकर म्हणाले. तसंच अनेक नेत्यांकडून अत्यंत प्रतिकूल हवामान, कार्बन उत्सर्जन विषयक आव्हानं आणि कर्जाचा बोजा हे मुद्देदेखील उपस्थित करण्यात आले.

**जयशंकर कुवेत**

परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंक आज कुवेतच्या दौऱ्यावर रवाना होत आहेत. या भेटीदरम्यान, ते कुवेतचे परराष्ट्रमंत्री अब्दुल्लाह अली अल याहया यांची भेट घेतील. तसंच कुवेतच्या राष्ट्रप्रमुखांचीही भेट घेण्याची शक्यता आहे. या दौऱ्यात उभय देशातल्या राजकीय, व्यापार, गुंतवणूक, उर्जा, सुरक्षा, संस्कृती तसंच दूतावास आणि लोकसंपर्क यासह द्वीपक्षीय संबधांच्या विविध पैलूंचा आढावा घेतला जाईल. मध्यपूर्व आणि दक्षिण आशियात विकसित होत असलेल्या भूराजकीय परिस्थितीसह उभय देशाच्या हिताच्या क्षेत्रीय आणि आंतरराष्ट्रीय मुद्द्यांवरही या दौऱ्यात वैचारिक आदान प्रदान होणार आहे.

**नेपाळ परराष्ट्र**

भारताच्या परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर यांच्या आमंत्रणाचा स्वीकार करून, नेपाळच्या परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉक्टर आरजू राणा देउबा यांचं आज पाच दिवसीय भारत दौऱ्यासाठी आगमन होत आहे. उभय देशांच्या नियमित उच्चस्तरीय देवाणघेवाणीच्यी परंपरेशी सुसंगत हा दौरा असल्याचं परराष्ट्र मंत्रालयानं दिलेल्या निवेदनात म्हटलं आहे. भारताच्या शेजारी प्रथम धोरणात, नेपाळ हा प्राधान्य असलेला भागीदार देश आहे. या दौऱ्यात उभय देशांच्या द्वीपक्षीय सहकार्य प्रगतीचा आढावा घेण्याची तसंच उभय देशांच्या संबंधात वृद्धी करण्याविषयी चर्चा करण्याची संधी मिळणार आहे. उभय देशांचे परराष्ट्र मंत्री नेपाळ-भारत संबंध मजबूत करण्याच्या आणि सहकार्याला चालना देण्याच्या उद्देशानं परस्पर हिताच्या बाबींवर चर्चा करतील, असं नेपाळच्या परराष्ट्र मंत्रालयानं दिलेल्या निवेदनात म्हटलं आहे.

**राजनाथ उद्घाटन**

संरक्षणमंत्री राजनाथ सिंह आज चेन्नई दौऱ्यावर जात आहेत. या भेटीदरम्यान भारतीय तटरक्षक दलाकडून  चेन्नईत उभारण्यात आलेल्या नव्या अत्याधुनिक सागरी बचाव समन्वय केंद्राचं तसंच सागरी प्रदुषण प्रतिसाद केंद्र तसंच पुद्दुचरी इथं उभारण्यात आलेलं तटरक्षक दलाच्या एअर एन्क्लेव्हचं उद्घाटनही सिंह यांच्या होणार आहे. चेन्नईस्थित प्रदुषण केंद्र, सागरी प्रदुषण व्यवस्थापनातलं अग्रगण्य पाऊल आहे. या केंद्रामुळे सागरी प्रदुषणाच्या घटना विशेषतः किनारपट्टीलगतच्या राज्यांमध्ये होणाऱ्या तेल आणि रसायन गळतीच्या घटनांमध्ये प्रतिसाद देण्यात समन्वयाची महत्त्वपूर्ण भूमिका बजावण्यात मदत होईल.  समुद्री सुरक्षा मजबूत करणे तसंच आपत्कालीन परिस्थितीत कार्यक्षम

प्रतिसाद देण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावण्यासाठी हे केंद्र सज्ज झालं आहे. या उद्घाटनांनंतर सिंह यांच्या हस्ते दिवंगत एम. करुणानिधी यांच्या जन्मशताब्दीनिमित्त काढण्यात आलेल्या नाण्याचं उद्घाटन करतील.

**डॉक्टर पंतप्रधान**

भारतीय वैद्यकीय संघटनेनं कोलकाता इथल्या कार वैद्यकीय महाविद्यालयात घडलेल्या घटनेबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहिलं आहे. आरोग्य कर्मचाऱ्यांवरील हिंसाचार रोखण्यासाठी केंद्रीय कायदा आणण्याची मागणी यामध्ये करण्यात आली आहे. सर्व रुग्णालायांमध्ये विमानतळांप्रमाणे सुरक्षा नियामक प्रणाली असावी, तसंच डॉक्टर कार्यरत असलेल्या परिस्थितीत सुधारणा करणं, अशा मागण्या संघटनेनं केल्या आहेत. अनिवार्य सुरक्षा हक्कांसह सर्व रुग्णालयं सुरक्षित क्षेत्र म्हणून घोषित करण्याची मागणीही पत्रात कऱण्यात आली आहे. या पत्रात, संघटनेनं अशा घटनांचा विशिष्ट कालमर्यादेत गुन्ह्याचा सूक्ष्म आणि व्यावसायिक पातळीवर तपास पूर्ण करून त्वरीत न्याय देण्याची मागणी केली असून, पीडित कुटुंबियांना योग्य भरपाई देण्याची मागणीदेखील केली आहे.

**आरोग्य कर्मचारी**

आरोग्य सेवेतील व्यावसायिकांच्या सुरक्षिततेसाठी सर्व संभाव्य उपाययोजना सुचवण्यासाठी केंद्र सरकारनं एक समिती स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. निवासी डॉक्टर्सची संघटना आणि भारतीय वैदयकीय संघटनेसह आरोग्य क्षेत्रातल्या विविध भागधारकांनी डॉक्टरांच्या सुरक्षिततेविषयी चिंता व्यक्त केली होती, त्यानंतर सरकारनं हा निर्णय घेतला. राज्य सरकारांना या विषयानुरूप समितीसमोर सूचना मांडण्यास सुचित करण्यात आलं आहे. शुक्रवारी जारी केलेल्या सूचनेनुसार, सरकारी रुग्णालयांना आरोग्य सेवा कर्मचाऱ्यांवर झालेल्या शाब्दिक अत्याचार किंवा शारीरिक हिंसाचाराच्या बाबतीत सहा तासांच्या आत प्राथमिक माहिती अहवाल नोंदवण्याचे निर्देश दिले असून, निर्धारीत कालावधीत अहवाल दाखल करण्यासाठी संस्था प्रमुख जबाबदार असेल असेही या सूचनेत म्हटले आहे. कोलकाता प्रकरणाच्या पार्श्वभुमीवर केंद्रसरकारनं ही सूचना जारी केली आहे.

**कोलकता**

दरम्यान कोलकात्यातील डॉक्टरवरील अत्याचार आणि हत्या प्रकरणातील आरोपी संजय रॉय याचं मानस शास्त्रीय मूल्यांकन केंद्रीय अन्वेषण विभाग,  करणार आहे. या प्रकरणी संपूर्ण देशभरात निषेध सुरू आहे. दिल्लीतील केंद्रीय न्यायवैद्यक विज्ञान प्रयोगशाळेचं मानसशास्त्रीय आणि वर्तन विश्लेषकांचं पथक त्याच्या आवश्यक चाचण्या करण्यासाठी कोलकत्यात दाखल झालं असल्याची माहिती अधिकृत सूत्रांनी दिली. सीबीआयनं रॉयला आधीच ताब्यात घेतलं आहे. दरम्यान, काल सलग दुसऱ्या दिवशी आर जी कार वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयाचे माजी प्राचार्य डॉ संदीप घोष यांची

सीबीआयनं काही तास चौकशी केली. त्यांना पुन्हा सीबीआय कार्यालयात चौकशीसाठी बोलावण्यात आलं आहे.

**राणा अमेरिका**

मुंबईत झालेल्या 26-11 च्या दहशतवादी हल्ल्यातल्या आरोपी तहव्वूर हुसैन राणाला भारताच्या ताब्यात देण्याचा निर्णय अमेरिकेच्या अपील न्यायालयानं दिला आहे. भारत आणि अमेरिका यांच्यात हस्तांतरणाचा करार असल्यानं, सध्या अमेरिकेच्या लॉसएंजलिस इथल्या तुरूंगात तहव्वूर राणाचं हस्तांतरण भारताकडे होऊ शकते असा निकाल न्यायालयानं दिला आहे. 2008 मध्ये झालेल्या या दहशतवादी हल्ल्यात 160 हून अधिक लोक मारले गेले होते. 63 वर्षीय राणाने न्यायदंडाधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशाला आव्हान देणारी याचिका अमेरिकेच्या अपील न्यायालयात आव्हान दिलं होतं. त्यावर न्यायालयानं हा निकाल दिला आहे. तहव्वूर राणा, हल्ल्याचा मुख्य सूत्रधार असलेल्या डेविड हेडलीशी संबंधित असून त्याचा आयएसआयशी संबंध असल्याचाही आरोप आहे.

**सोने तस्करी**

मुंबई विमानतळावर महसूल गुप्तचर विभागानं, मुंबईला उतरलेल्या दोन व्यक्तींकडून तस्करी करण्यात येत असलेलं साडेचार किलो सोने जप्त केलं. अबुधाबी ते मुंबई असा प्रवास केलेल्या या दोन व्यक्तींची महसूल अधिकाऱ्यांनी तपासणी केल्यानंतर त्यापैकी, एकाच्या अंगावर घातलेल्या जाकिटाच्या आत चार पाकिटं दडवलेली आढळली. अबुधाबी विमानतळावर ही पाकिटे या व्यक्तीकडे देण्यात आल्याचं चौकशीदरम्यान सांगितल्याचं बातमीत म्हटलं आहे.

**बॅड मिंटनपूल**

चीनमधील चेंगडू इथं येत्या 20 तारखेपासून सुरू होणाऱ्या 15 आणि 17 वर्षांखालील कनिष्ठ गटाच्या आशियाई अजिंक्य पद बडमिंटन स्पर्धेसाठी भारतानं 39 खेळाडूंचा संघ पाठवला आहे. 17 वर्षांखालील गटाचं नेतृत्व  श्याम बिंडीगणविले तर 15 वर्षांखालील गातच नेतृत्व तन्वी पत्री करणार आहे. गुवाहाटी मधल्या सराव शिबिरानंतर भारतीय संघ काल चेंगडूला रवाना झाला.चीन मध्ये गेल्या वर्षी झालेल्या या अजिंक्य पद स्पर्धेत भारतानं प्रत्येकी एक सुवर्ण, रौप्य आणि कांस्य पदक पटकावलं आहे. पुढील वर्षी कनिष्ठ गटाच्या जागतिक अजिंक्य पद स्पर्धेचं यजमानपद भारतानं स्वीकारलं आहे.

**भूकंप पूल माधुरी**

रशियाच्या पूर्व किनाऱ्याला आज पहाटे 7 रिश्टर स्केल तीव्रतेचा भूकंपाचा धक्का बसला. अमेरिकेच्या भु वैज्ञानिक सर्वेक्षण संस्थेनं ही माहिती दिली. भूकंपाचं केंद्र पेट्रो पावलोस्क - कामशाकी  शहरापासून 88 किलोमीटर अंतरावर आणि 48 किलोमीटरपेक्षा जास्त खोल होतं. रशियाच्या किनारपट्टीवर

भूकंपाचा केंद्रबिंदू असलेल्या 300 किलोमीटर परिसरात त्सुनामीच्या लाटा येऊ शकतात अशी शक्यता अमेरिकेच्या हवामान विभांगानं वर्तवली होती. मात्र नंतर हवामान विभागानं ही शक्यता फेटाळून लावली.

**याबरोबर आकाशवाणी पुणे केंद्रावरील राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.**